249

## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 1975.

## THE LOCAL AUTHORITIES LOANS (MAHARASHTRA UNIFICATION AND AMENDMENT) ACT, 1975

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ३० ऑगस्ट १९७५ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोत्रे,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 1975.

AN ACT TO PROVIDE FOR UNIFORMITY IN THE LAW RELATING TO THE GRANT OF LOANS TO LOCAL AUTHORITIES (OTHER THAN CANTONMENT AUTHORITIES AND PORT AUTHORITIES IN MAJOR PORTS) IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR THAT AND CERTAIN OTHER PURPOSES TO AMEND THE LOCAL AUTHORITIES LOANS ACT, 1914.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर [illegible] दिनांक ६ सप्टेंबर १९७५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांना (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे यांशिवाय) कर्जे देण्यासंबंधीच्या विधींच्या एकरूपतेसाठी तरतूद करणे व त्यासाठी आणि इतर विवक्षित प्रयोजनांसाठी स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९१४ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांना (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे यांशिवाय) कर्जे देण्यासंबंधीच्या विधींच्या एकरूपतेसाठी तरतूद करणे व त्यासाठी आणि इतर विवक्षित प्रयोजनांसाठी स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९१४ यात सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत (महाराष्ट्र एकरूपता व सुधारणा) अधिनियम, १९७५, असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील, अशा तारखेस अंमलात येईल.

हाराष्ट्र ... सन ... १४ चा जनार्थ, ... धनियम याचे मुंबई क्षेत्रात

२. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक प्राधिकरणांना (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे नसलेल्या) कर्जे देण्यासंबंधीच्या विधीच्या एकरूपतेसाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९१४ चे (त्याच्या कलम ८ शिवाय) उपबंध व तदन्वये केलेले नियम हे, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगत पूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात जसे अंमलात होते, तसे ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अंमलात असतील; व त्यानुसार,—

रूपता व ... नामरूप उपबंध.

(अ) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९१४ व त्या अधिनियमान्वये केलेले व राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेले नियम यांमध्ये, स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत (मध्यप्रांत व वऱ्हाड सुधारणा) अधिनियम, १९२२ याद्वारे केलेली सुधारणा ही ते त्या प्रदेशास प्रयुक्त असताना, (केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल त्याशिवाय) अंमलात असण्याचे बंद होईल व निरसित होईल; आणि

(ब) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत आईन-१३५२, फसली व त्या आईन अन्वये केलेले व महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात अंमलात असलेले नियम हे (केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल त्याशिवाय) निरसित होतील.

न १९१४ ... अधिनियम ... याच्या महाराष्ट्र ... कलम १ ... सुधारणा.

३. या अधिनियमाच्या कलम २ अन्वये उपबंधित केल्याप्रमाणे, स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९१४ (ज्याचा निर्देश यापुढे "मुख्य अधिनियम" असा केला आहे) संपूर्ण महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, उक्त अधिनियमाच्या कलम १, पोट-कलम (२) मधील "१ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग ब मध्ये समाविष्ट असलेली" या मजकुरानंतर "महाराष्ट्र राज्यातील हैदराबाद क्षेत्राखेरीज इतर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१ १९१४ अधिनियम ... याच्या ... कलम ३ चा सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (१), खंड (पाच) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(सहा) तात्पुरत्या अकल्पित वित्तीय अडचणींच्या बाबतीत, आपल्या आस्थापनेचा खर्च भागविणे;

(सात) ज्याकरिता या कलमात आधीच तरतूद केलेली नसेल असा तातडीचा व अकल्पित स्वरूपाचा कोणताही अपवादात्मक खर्च.".

न १९१४ चा अधिनियम ... याच्या कलम ७ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या परंतुकातील खंड (क) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये यथोचित रीत्या रचना केलेल्या कोणत्याही जिल्हा परिषदेस, त्या अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये ज्याची वसुली करण्यात आलेली नाही किंवा ज्याची वसुली निलंबित ठेवण्यात आलेली आहे अशा, उक्त अधिनियमाच्या कलमें १४४, १५१ व १५२ अन्वये बसवण्यात येणाऱ्या, उपकराच्या रकमेइतके अग्रिम राज्य शासनाकडून मिळण्यास अवरोध होतो.".

व्यावृत्ती.

६. (१) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत आईन-१३५२, फसली हा महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रास प्रयुक्त असताना, त्याच्या उपबंधानुसार किंवा तदन्वये व या अधिनियमाच्या कलम २ अन्वये निरसित केलेल्या स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्याबाबत (मध्यप्रांत व वऱ्हाड सुधारणा) अधिनियम, १९२२ द्वारे सुधारणा केलेल्या व मुख्य अधिनियमाच्या उपबंधानुसार (कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला दिलेली किंवा अशा प्राधिकरणाने उभारलेली कोणतीही कर्जे धरून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य

अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम उपबंधानुसार केली असल्याचे मानण्यात येईल ; व मुख्य अधिनियमानुसार केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कोणत्याही कार्यवाहीद्वारे तीमध्ये फेरफार करण्यात येईपर्यंत, ती निरसित करण्यात येईपर्यंत किंवा तीमध्ये सुधारणा करण्यात येईपर्यंत, त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) या अधिनियमाच्या संबंधात, पोट-कलम (१) मधील विशिष्ट बाबींच्या उल्लेखामुळे मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ (जो निरसनाच्या परिणामांशी संबंधित आहे) याच्या कलम ७ च्या सर्वसाधारण प्रयुक्तीवर परिणाम होणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कानिटकर,
प्रभारी भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.